**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**संचालनालय, लेखा व कोषागारे**

**कस्तुरी इमारत, तळ मजला, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर**

**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**

**दुरध्वनी क्रमांक : ०२२-२२८८०१०६** E-Mail: aaoadmin-dat@mah.gov.in


क्र.संलेको-०९-२०२६/प्रशा-राप-सलेअ/वले-१/दिव्याग आरक्षण/पदोन्नती-१६-२५/६९१ दिनांक :- 28 SEP 2026

**संदर्भ:-**

१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग एसआरव्ही २०१५/प्र.क्र. ३०३/कार्या-१२,दि.१२.०९.२०१६
२. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक सेवाप्र २०१६/प्र.क्र.६४/कोषा-प्रशा ३, दि.०६.०१.२०१७
३. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक सेवाप्र २०१७/प्र.क्र.१७/कोषा-प्रशा ३, दि.२७.०३.२०१७
४. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग एसआरव्ही २०१५/प्र.क्र. ३१०/कार्या-१२,दि.१५.१२.२०१७
५. शासन अधिसूचना वित्त विभाग क्र. सेवाप्र-२०१६/प्र.क्र.६५/कोषा. प्रशा.३, दि.२८.०९.२०१८
६. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग एसआरव्ही २०१८/प्र.क्र. १५९/कार्या-१२,दि.०१.०८.२०१९
७. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१.
८. शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१/बारा, दि. २१.०६.२०२१.
९. शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि. १४.०७.२०२१.
१०. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिव्यांग २०२२/प्र.क्र.८३/१६-अ, दि. २०.०४.२०२३.
११. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिव्यांग २०२२/प्र.क्र.८३/१६-अ, दि. २९.०७.२०२४.
१२. संचालनालयाचे आदेश क्र.संलेको-०८-२०२६/प्रशा-राप-सलेअ/वले-१/दिव्यांग आरक्षण पदो./ २०१६-२५/५४९, दि.२४.०८.२०२६
१३. संचालनालयाचे परिपत्रक क्र.संलेको-०९-२०२६/प्रशा-राप-सलेअ/वले-१/दिव्यांग-पदोन्नती-१६-२५/विकल्प/५८४, दि.०९.०९.२०२६

**विषय:-** महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील सहायक लेखा अधिकारी पदावर दिव्यांग आरक्षणानुसार निवडसूची वर्ष २०१५-१६ (दि.३०.०६.२०१६ ते दि.३१.०८.२०१६) ते २०२४-२५ दरम्यान नियमित पदोन्नतीचा दिनांक मंजूर झालेल्या कर्मचाऱ्यांना पदस्थापना देणेबाबत.

## आदेश

संचालनालयाच्या संदर्भ क्र. १२ अन्वये निर्गमित आदेशानुसार, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२९.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी तसेच दि.२०.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील

विहित पात्रता अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, उपलेखापाल, वरिष्ठ लेखा परीक्षक, निवड श्रेणी लिपिक व सहायक अधीक्षक या निम्न संवर्गातून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील सहायक लेखा अधिकारी पदावर दिव्यांग आरक्षणानुसार निवडसूची वर्ष २०१५-१६ (दि.३०.०६.२०१६ ते दि.३१.०८.२०१६) ते २०२४-२५ या कालावधीतील नियमित पदोन्नतीचा दिनांक मंजूर करण्यात आलेला आहे.

संदर्भीय शासन निर्णय, शासन अधिसूचना तसेच प्रचलित नियम व तरतुदींनुसार, नियमित पदोन्नतीचा दिनांक मंजूर झालेल्या खालील दिव्यांग कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील सहायक लेखा अधिकारी पदावर पदोन्नतीने सहायक लेखा अधिकारी / सहायक लेखा परीक्षा अधिकारी / उपकोषागार अधिकारी या पदांवर खालीलप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | मागणी केलेला महसुली विभाग | वाटप केलेला महसुली विभाग | पदोन्नतीने दिलेले पद व कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री. पंढरीनाथ भाऊराव निकम, उपलेखापाल (दिव्यांग प्रकार : अ- अंध व अल्पदृष्टी) | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर (विकल्पात सुट) | सहायक लेखा अधिकारी, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर | रिक्त पदी |
| २ | श्री. अरविंद वासुदेव साळुंके, वरिष्ठ लेखा परीक्षक (दिव्यांग प्रकार : क- अस्थिव्यंग) | नाशिक | नाशिक (विकल्पात सुट) | सहायक लेखा परीक्षा अधिकारी, सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, नंदुरबार | रिक्त पदी |
| ३ | श्री. छबिदास जयराम चारस्कर, उपलेखापाल (दिव्यांग प्रकार : अ- अंध व अल्पदृष्टी) | कोकण-१ | कोकण-१ (विकल्पात सुट) | उपकोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, पालघर | रिक्त पदी |
| ४ | श्री. मनोज रामदास झेंडे, उपलेखापाल (दिव्यांग प्रकार : ब- कर्णबधीर) | कोकण-२ | कोकण-२ (विकल्पात सुट) | सहायक लेखा अधिकारी, सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, ठाणे | रिक्त पदी |
| ५ | श्रीमती सुषमा बाळू जगदाळे, उपलेखापाल (दिव्यांग प्रकार : क- अस्थिव्यंग) | कोकण-२ | कोकण-२ (विकल्पात सुट) | सहायक लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई | रिक्त पदी |

१. संदर्भाधीन दि.२९.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार, संबंधित दिव्यांग उपलेखापाल, वरिष्ठ लेखा परीक्षक, सहायक अधीक्षक व निवड श्रेणी लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना दिव्यांग आरक्षणानुसार ज्या दिनांकास सहायक लेखा अधिकारी पदावर नियमित पदोन्नती देण्यात आली आहे, त्या दिनांकापासून काल्पनिकरीत्या पदोन्नतीचा लाभ अनुज्ञेय राहील. तथापि, सदर पदोन्नतीचा प्रत्यक्ष आर्थिक लाभ संबंधित कर्मचाऱ्यांनी सहायक लेखा अधिकारी पदाचा प्रत्यक्ष पदभार स्वीकारलेल्या दिनांकापासून अनुज्ञेय राहील.

२. या आदेशान्वये सहायक लेखा अधिकारी पदावर नियमित पदोन्नती मिळालेल्या संबंधित कर्मचाऱ्यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी विहित मुदतीत पदोन्नतीच्या पदावर रुजू होणे अनिवार्य राहील. विहित मुदतीत संबंधित कर्मचारी पदोन्नतीच्या पदावर रुजू न झाल्यास, सदर पदोन्नती स्वीकारण्यात त्यांना स्वारस्य नाही, असे गृहीत धरून दिव्यांग आरक्षणाच्या आधारे देण्यात आलेली पदोन्नती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

३. उपरोक्त कर्मचाऱ्यांना १०/२० वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर सुधारीत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत सहायक लेखा अधिकारी / सहायक लेखा परीक्षा अधिकारी / उपकोषागार अधिकारी या पदांची वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्यात आलेली असल्यास आणि या आदेशान्वये देण्यात आलेली पदोन्नती संबंधित कर्मचाऱ्यांनी नाकारल्यास, पदोन्नती नाकारणाऱ्या कर्मचाऱ्यांना सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१२.०९.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती लागू राहतील. तसेच, यापूर्वी वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्यात आलेली असल्यास, सदर लाभ नियमानुसार काढून घेण्यात येईल.

४. संदर्भांकित अधिसूचना क्र.११ मधील परिच्छेद (ड) मध्ये नमूद केल्यानुसार, हा आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून संबंधित सर्व कर्मचाऱ्यांनी ३० दिवसांच्या आत पदोन्नतीच्या पदावर रुजू होणे आवश्यक राहील. विहित मुदतीत संबंधित कर्मचारी पदोन्नतीच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांनी पदोन्नती स्वीकारण्यात स्वारस्य दाखविलेले नाही, असे समजून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

५. उपरोक्त कर्मचाऱ्यांना पदोन्नतीने देण्यात आलेल्या पदस्थापना सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१४.०७.२०२१ रोजीच्या शासन अधिसूचनेतील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात आलेल्या आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांनी सदर अधिसूचनेचे अवलोकन करावे. सदर अधिसूचनेतील निर्देशांनुसारच संबंधित कर्मचाऱ्यांना महसुली विभाग तसेच जिल्हानिहाय पदस्थापना देण्यात आलेली आहे. पदस्थापनेत बदल करून घेण्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याने राजकीय अथवा अन्य कोणत्याही माध्यमातून दबाव आणल्यास, संबंधित कर्मचारी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहील. तसेच, लागू असल्यास, अशा कर्मचाऱ्यांच्या सरळसेवा नियुक्तीच्या आदेशाबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. संबंधित कर्मचाऱ्यांना वाटप करण्यात आलेला महसुली विभाग अथवा जिल्हानिहाय पदस्थापनेत बदल करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

६. प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची पदस्थापना, ते ज्या दिनांकापासून त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या कार्यालयातून कार्यमुक्त होतील त्या दिनांकापासून, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा इ.) नियम, १९८१ मधील परिशिष्ट-२ तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रके यांमधील लागू अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

७. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ तसेच त्यासंदर्भातील न्यायालयीन कार्यवाहीच्या अधीन राहून, पदोन्नती कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ रोजीच्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेच्या आधारे, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांनुसार, तसेच सदर शासन निर्णयास मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे देण्यात आलेल्या आव्हानावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून, उपरोक्त विवरणपत्रातील कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात येत आहे.

८. संबंधित कर्मचाऱ्यांच्या सध्याच्या पदावरील तसेच पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आलेल्या पदावरील कार्यालय प्रमुखांना सूचित करण्यात येते की, सदर आदेश संचालनालयाच्या <u>www.mahakosh.maharashtra.gov.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला असल्याने, संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करणे अथवा पदोन्नतीच्या पदावर हजर करून घेण्याच्या कार्यवाहीसाठी संकेतस्थळावर उपलब्ध असलेली आदेशाची प्रत ग्राह्य धरण्यात यावी.

२८/१/२६.

**(दीपा देशपांडे)**
**संचालक, लेखा व कोषागारे**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रत अग्रेषित:**

१. सहसचिव (कोपा प्रशा. ३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२. उपसचिव (का. क्र. १२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
५. सहसंचालक, लेखा व कोषागारे (सर्व).
६. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा (सर्व)
७. संबंधित कर्मचाऱ्यांचे सध्याच्या पदावरील कार्यालय प्रमुख.
८. संबंधित कर्मचाऱ्यांचे नियुक्तीच्या पदावरील कार्यालय प्रमुख.
९. उपसंचालक (प्रशिक्षण), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई.
१०. कोषागार अधिकारी (सर्व),
११. सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा (सर्व).
१२. निवड नस्ती.